दैनिक हेराल्ड
शनिवार, १२ डिसेंबर २०१५
Dainik Herald, Saturday, December 12, 2015

# केरमधील महाकाय वृक्षावर करणार संशोधन

## राजेंद्र आर्लेकर, डॉ. अनिल पाटील यांची माहिती

दोडामार्ग, दि. ११ (वार्ताहर) :

शेकडो वर्षांपासून केर गावाच्या मध्यभागी महाकाय वृक्ष आहे. या वृक्षांची पावसाळ्यात सर्वपाने गळून पडतात तर उन्हाळ्यात वृक्षाला पालवी येथे महत्त्वाचे म्हणजे विस्तीर्ण वनसंपदेत हा एकमेव वेगळ्या जातीचा वृक्ष आहे. याकडे केरे गावाचे सरपंच प्रेमानंद देसाई यांनी लक्ष वेधले असता केर. गावात मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्रमानिमित्त आलेल्या गोवा राज्याचे पर्यावरण मंत्री राजेंद्र आर्लेकर व महाविद्यालयाचे व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील यांनी या वृक्षांचा अभ्यास करणार असल्याचे सांगितले.





केर : १) महाकाय वृक्ष. २) महाकाय वृक्षांसंबंधी नागरिकांकडून माहिती जाणून घेताना मंत्री राजेंद्र आर्लेकर. सोबत डॉ. अनिल पाटील व इतर.

केर गावात 'देवाचे झाड' असे नामकरण असलेला महाकाय वृक्ष गावाच्या मध्यभागी आहे. या वृक्षाचा विस्तार प्रचंड असून खोडही मोठे आहे. गावात कुठेही उभे राहिले तरी हा वृक्ष दृष्टीस येतो एवढी उंची आहे. सध्याच्या पिढीत म्हणजे केर गावात शंभरी गाठलेल्या जाणते व्यक्त आहेत. मात्र, त्यांनाही या वृक्षाचे नाव माहिती ना जन्म. मात्र, पूर्वीपासून देवाचे झाड असे याला संबोधले जाते. केर गावात जिल्ह्यात प्रथमच विद्यापीठस्तरीय एन.एस.एफ.कॅम्पचे आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये पर्यावरण संवर्धन असा विषय असून यावर सात दिवस मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन पर्यावरण मंत्री राजेंद्र आर्लेकर व प्रमुख अथिती म्हणून डॉ. अनिल पाटील उपस्थित होते. यावेळी गावचे सरपंच प्रेमानंद देसाई यांनी पर्यावरणाशी संबंधित गावातील या वृक्षाचे वर्णन सांगितले. त्यानंतर उद्घाटनाच्या कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष वृक्षस्थळी भेट दिली. यावेळी जुन्या जाणत्या ग्रामस्थांनी आर्लेकर व पाटील यांना माहिती दिली.

या वृक्षाच्या बिया जमिनीवर पडतात पण वृक्ष रुजले नाहीत तसेच पावसाळ्यात वृक्षाला पाने नसतात, उन्हाळ्यात पालवी फुटते, शेकडो वर्षांपासून कधीच झाडांची फांदी तुटली नाही हे ऐकून हा संशोधनाचा विषय असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. गोवा राज्याची तसेच मुंबई विद्यापीठाची स्वतंत्र टीम यावर अभ्यास करेल, असे उपस्थितांना त्यांनी सांगितले.